Reg. No. MCS/069/2018-20 R. N. I. Reg. No. 1591/57
वर्ष ७९, अंक ४४, ५ रुपये, शहर आवृत्ती, पृष्ठे १२ ★

मुंबई, सोमवार, ९ मार्च २०२६ WWW.LOKSATTA.COM

# लोकसत्ता

मुंबई, पुणे, नागपूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती!

**अग्रलेख**

## जा जरा दक्षिणेकडे!

वाढत्या कर्जांवरील व्याज व प्रशासन खर्च यांत राज्याचा ५५ टक्के महसूल कामी येतो. उरलेल्या ४५ टक्क्यांत १३ कोटींचे भले करण्यासाठी सरकारी उत्पन्न वाढायला हवे...



**क्रीडा**

**लक्ष्य सेनचे उपविजेतेपदावर समाधान**

Vencobb

| | | |
|---|---|---|
| ब्रॉयलर विकण्याचा दर (पोल्ट्रीफार्मवर) | १३२ | रु. प्रति किलो |
| किरकोळ विक्रीचा दर जिवंत कोंबडी | १६० | रु. प्रति किलो |
| ड्रेस्ड कोंबडी (किरकोळ) दर | २०० | रु. प्रति किलो |
| अंडी किरकोळ विक्री दर | ६२ | रु. प्रति १२ अंडी |

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २४° से

हवामानाचा अंदाज
आकाश निरभ्र राहील.

**काय चाललंय काय!**

प्रशांत कुलकर्णी



मध्यपूर्वेला ही जी आग येताना दिसतेय ना, तिथे असू शकतं नवीन व्हिएतनाम!!




## भारत तिसऱ्यांदा ट्वेन्टी-२० विश्वविजेता

- सलग दुसरे विश्वविजेतेपद, एकूण तिसरे विश्वविजेतेपद, विश्वचषक जिंकणारा पहिला सहयजमान देश, उपान्त्य आणि अंतिम सामन्यात अडीचशेहून अधिक धावा करणारा पहिला संघ! ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये रविवारी भारताने धावांबरोबरच विक्रमांच्या राशी रचल्या. आयपीएलच्या प्रभावामुळे ट्वेन्टी-२० या प्रकारातील भारताचे वादातीत वर्चस्व यानिमित्ताने अधोरेखित झाले.
- दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुपर एट टप्प्यातील पहिल्या सामन्यात दारुण पराभव झाल्यानंतर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ पुढील प्रत्येक सामना अंतिम सामना असल्याच्या एकाग्रतेने खेळला. झिम्बाब्वे, वेस्ट इंडिज, इंग्लंड आणि अंतिम सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध फलंदाजी करताना भारताने २०० ते २५० धावांचेच लक्ष्य ठेवले आणि ते पारही करून दाखवले.
- भारताची या स्पर्धेतली वाटचाल आदर्शवत नव्हती. भरवशाचे फलंदाज निराश करत होते. पण कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी आपल्या व्यूहरचनेवर आणि क्रिकेटपटूंवर विश्वास ठेवत मोजकेच बदल केले आणि ते यशस्वी ठरले. - संबंधित / क्रीडा

# खामेनींच्या पुत्राकडे इराणची सूत्रे?

## धर्मगुरूंच्या मंडळाकडून संकेत



**तेहरानमधील तेलसाठे लक्ष्य**

**रॉयटर्स, दुबई**

**इराणच्या सर्वोच्च** नेतेपदी आयातुल्ला अली खामेनी यांच्यानंतर कोण असेल, यावर धर्मगुरूंच्या मंडळात एकमत झाले आहे. या मंडळातील आयातुल्ला मोहंमदमेहदी मिर्बाकिरी यांनी ही माहिती दिली. खामेनी यांचा मुलगा मोजताबा खामेनी यांची इराणच्या सर्वोच्च नेतेपदी निवड केल्याची शक्यता असल्याचे धर्मगुरूंच्या मंडळातील एका सदस्याने सूचित केले.

इराणच्या सर्वोच्च नेतेपदाची निवड करणाऱ्या धर्मगुरूंच्या मंडळातील वरिष्ठ सदस्याने सांगितले, की 'अमेरिकेसारख्या सैतानानेही त्यांच्या नावाचा उल्लेख केला आहे.' अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोजताबा खामेनी यांच्याशिवाय इराणला दुसरा पर्याय नसल्याचे विधान केले होते. त्यामुळे ही निवड केल्याचे अप्रत्यक्षरीत्या त्यांनी सूचित केल्याचे मानले जात आहे. मात्र, अद्याप काही प्रक्रिया बाकी असल्याचे मंडळातील सदस्यांनी सांगितले.

'इराणने आपला पुढील सर्वोच्च नेता निवडला आहे,' असे धर्मगुरूंच्या मंडळातील आयातुल्ला मोहसीन हैदरी अलेकासिर आणि अहमद अलामोल्होदा या दोन सदस्यांनी सांगितल्याचे वृत्त इराणमधील माध्यमांनी दिले आहे. या मंडळाच्या सचिवालयाचे प्रमुख आयातुल्ला हुसेनी बुशेरी हे धर्मगुरूंच्या मंडळाचा निर्णय सांगतील, असे अलामोल्होदा म्हणाले. हा निर्णय जाहीर करण्यासाठी सर्व मंडळाने एकत्र जमायचे, की प्रक्रियेतील हा भाग वगळून निर्णय जाहीर करायचा, हे अद्याप ठरायचे आहे, असे इराणमधील माध्यमांनी म्हटले आहे. सध्याच्या परिस्थितीत अशी बैठक शक्य नसल्याचे मंडळातील बहुतेक सदस्यांचे मत आहे. खामेनी यांच्या (पान १० वर)

- इस्रायलने इराणमधील तेलसाठ्यांनाही लक्ष्य केले आहे. इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी युद्धाच्या पुढील टप्प्यात अनेक आश्चर्ये पाहायला मिळतील, असा इशारा दिला आहे.
- ट्रम्प यांनी इराणला पूर्ण शरणागती पत्करण्याचे केलेले आवाहन इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी धुडकावून लावले आहे.
- लेबनॉनमधील इराणच्या पाठीराख्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी इस्रायलने लेबनॉनवर हल्ले केले आहेत. तेथे आणखी १२ जणांचा मृत्यू झाला आहे.
- एकूण मृतांची संख्या ३०० हून अधिक झाली आहे. नेतान्याहू यांनी युद्धाचा पुढील टप्पा जाहीर करताना इराणचे सरकार उलथून टाकायचे असल्याचे सांगितले.

### सौदी अरेबियात भारतीयाचा मृत्यू

इराणशी सुरू असलेल्या युद्धात लक्ष्यांचा विस्तार आता नागरी पायाभूत सुविधांपर्यंत गेला आहे. क्षेपणास्त्राचा तुकडा निवासी भागात पडल्याने एका भारतीयाचा मृत्यू झाला आहे. सौदी अरेबियाने रविवारी सायंकाळी दिलेल्या निवेदनात ही माहिती दिली. भारतीयाबरोबर बांगलादेशी नागरिकाचाही मृत्यू झाला असून १२ बांगलादेशी नागरिक जखमी झाले आहेत.

### संसद अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा अर्थात उत्तरार्ध सोमवारपासून सुरू होत आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात विरोधकांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. त्यावर चर्चा होणार आहे. याशिवाय पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर सोमवारी निवेदन करतील. रशियाकडून तेल खरेदी, पश्चिम बंगालमधील मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरावलोकन हे मुद्दे गाजण्याची शक्यता आहे. – पान ४

### अकोल्यात देशातील सर्वाधिक तापमान

**मुंबई :** विदर्भातील अकोला येथे रविवारी देशातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली आहे. अकोल्यात ४०.९ इतक्या तापमानाची नोंद झाली असून, अकोला, अमरावती, वर्धा येथे उष्णतेच्या लाटेची स्थिती निर्माण झाली आहे. पुढील दोन दिवस विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही ठिकाणी उष्णतेची लाटसदृश स्थिती निर्माण होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. – पान ३

### वित्तीय तूट, कर्ज, व्याज रकमेत वाढ

**मुंबई :** लाडकी बहीण, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा काही लोकप्रिय घोषणांच्या अंमलबजावणीमुळे गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा महसुली तसेच राजकोषीय तूट मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत राजकोषीय तूट ही तीन टक्क्यांपर्यंत असावी, अशी तरतूद असताना यंदाच्या आर्थिक वर्षात ही तूट २.९७ टक्क्यांपर्यंत गेली आहे. याबरोबरच कर्जाचा बोजा ११ लाख कोटींपेक्षा अधिक होणार असताना, कर्जावरील व्याज फेडण्यासाठीही सर्वाधिक रक्कम खर्च होणार आहे. – पान ४

म्हाडा, एमएमआरडीएसह अन्य प्राधिकरणांकडे १०० ते १५० एकरांवरील प्रकल्प

# झोपडपट्ट्यांचा समूह पुनर्विकास सरकारी यंत्रणांकडून

**मंगल हनवते, लोकसत्ता**

**मुंबई :** मुंबईतील रखडलेल्या अंदाजे २०० झोपडपट्टी पुनर्वसन योजना मार्गी लावण्याची जबाबदारी राज्य सरकारने म्हाडा, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, मुंबई महापालिका, सिडको, महाप्रीत आणि एमआयडीसी यांच्यावर टाकली आहे. राज्य सरकारने याबाबतचा निर्णय घेतला असून १०० ते १५० एकरांवरील झोपु प्रकल्प सरकारी यंत्रणांना दिले जाणार आहेत.

यासंबंधीचा अभ्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून करण्यात येत असून, त्यानंतर कोणते समूह झोपु प्रकल्प कोणत्या यंत्रणेकडे सोपवायचे याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे. झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्यासाठी झोपु प्राधिकरणाच्या माध्यमातून झोपु योजना राबविण्यात येत आहेत. मात्र आजही १० लाखांहून अधिक झोपडपट्टीवासीय पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत. तर २०० हून अधिक झोपु योजना विविध कारणांमुळे रखडल्या आहेत. रखडलेल्या झोपु योजना मार्गी लावण्यासाठी काही वर्षांपूर्वी राज्य सरकारने त्यांची जबाबदारी म्हाडा, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, सिडको, महाप्रीत, एमआयडीसी आणि मुंबई महापालिका यांच्यावर सोपवली होती. अंदाजे २३३ प्रकल्प आणि त्यातील दोन लाख १३ हजार झोपड्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी या यंत्रणांना देण्यात आली.

एमएमआरडीएने माता रमाबाईनगर-कामराज नगर झोपु योजना हाती (पान १० वर)



### मानखुर्दमध्ये पहिला प्रकल्प?

आता राज्य सरकारने इमारतींच्या समूह पुनर्विकासाच्या धर्तीवर झोपड्यांचेही समूह पुनर्वसन करण्याचा निर्णय घेत त्यास मान्यता दिली आहे. राज्य सरकारच्या मान्यतेनुसार मुंबईत कुठे कुठे झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबवता येतील, त्यातही १०० ते १५० एकरांवरील प्रकल्प कुठे आहेत याचे सर्वेक्षण झोपु प्राधिकरणाकडून सुरू आहे. मानखुर्दमध्ये पहिला झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबवला जाण्याची शक्यता आहे. तर पहिल्या टप्प्यात १७ झोपु समूह पुनर्वसन योजना राबवल्या जाण्याचीही शक्यता आहे.




# मेट्रोसाठी ठाण्यातील तीन हजार वृक्षांवर कुऱ्हाड

**किशोर कोकणे, लोकसत्ता**

**ठाणे :** ठाणे शहरात मेट्रो ४ आणि ५, बोरिवली-ठाणे भुयारी मार्ग, साकेत - माजिवडा उन्नत मार्ग अशा विविध प्रकल्पांसाठी वृक्षांचे बळी दिले जात असताना आता नव्याने तयार होणाऱ्या ठाणे शहरातील अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्पामुळे तब्बल ३ हजाराहून अधिक वृक्षांवर कुऱ्हाड चालविली जाणार आहे.

यातील ५१९ वगळता उर्वरित वृक्षांचे पुनर्रोपण केले जाणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे. पुनर्रोपण केलेले वृक्ष जगत नसल्याचा दावा पर्यावरणवाद्यांकडून केला जातो. त्यामुळे येत्या काही दिवसांत ठाण्यातील वृक्षसंपदा नव्या प्रकल्पांच्या रेट्यामुळे नष्ट होण्याची भीती आहे. शहरात गेल्या काही वर्षांत वाहतूक कोंडीची गंभीर स्थिती आहे. मागील काही वर्षांपासून शहरात मेट्रो, भुयारी मार्ग, उन्नत मार्ग, रस्ता रुंदीकरण, जलवाहिनी (पान १० वर)

**ठाणे शहरातील उपवन, घोडबंदर, राबोडी, वागळे इस्टेट, लोकमान्य नगर या भागात ही वृक्षतोड होणार आहे. यातील ५१९ वगळता उर्वरित वृक्षांचे पुनर्रोपण केले जाणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.**



ठाणे महापालिकेने वृक्षतोडीसंदर्भात उपवन येथील वृक्षांवर नोटीस चिटकविली आहे. या प्रकल्पांमुळे वृक्षांची कत्तल होत असून पुनर्रोपण केलेले वृक्षदेखील जगत नाहीत.
**– निशांत बंगेरा,** पर्यावरणवादी कार्यकर्ते